महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : १७९ वे दिनांक : २४/०६/२०२६ वार : बुधवार

## “किंग एडवर्ड काही अतिरेकी नव्हते”; के.ई.एम. रुग्णालयाच्या नामांतरावरून विधान परिषदेत जोरदार खडाजंगी




**मुंबई** : मुंबईतील आणि देशातील सर्वसामान्यांचे हक्काचे रुग्णालय असलेल्या परळ येथील के.ई.एम. रुग्णालयाचे नाव बदलण्याचा प्रस्ताव पुन्हा एकदा राजकीय वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. मुंबईचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मुंबई महानगरपालिकेकडे पाठवलेल्या या प्रस्तावावरून विधान परिषदेत जोरदार खडाजंगी पाहायला मिळाली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार मिलिंद नार्वेकर आणि सचिन अहिर यांनी या मुद्द्यावरून सरकारला धारेवर धरले, तर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी यावर सरकारची अधिकृत भूमिका स्पष्ट केली.

विधान परिषदेत हा मुद्दा उपस्थित करताना आमदार मिलिंद नार्वेकर यांनी अत्यंत आक्रमक शब्दांत सरकारला जाब विचारला. ते म्हणाले, "मुंबईत जेव्हा प्लेगची भीषण साथ आली होती, तेव्हा किंग एडवर्ड यांनी दिलेल्या निधीतून या रुग्णालयाची उभारणी करण्यात आली. मग किंग एडवर्ड या व्यक्तीवर सरकारचा इतका राग का आहे? ते काही अतिरेकी नव्हते की ज्यांच्या नावाचे रुग्णालय तातडीने बदलले पाहिजे. पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी हे नाव बदलून ‘कौशल्य एकलव्य मेमोरियल रुग्णालय’ असा प्रस्ताव दिला आहे. मग किंग एडवर्ड यांच्या नावाचा आणि त्यांच्या दातृत्वाचा मान सरकार कसा राखणार? हे नामांतर करण्याचा हा आटापिटा नेमका कशासाठी सुरू आहे?" असा सवाल मिलिंद नार्वेकर यांनी सरकारला केला.

या चर्चेत सहभाग घेत ठाकरे गटाचे दुसरे आमदार सचिन अहिर यांनी पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या व्यावसायिक पार्श्वभूमीवरून थेट निशाणा साधला. "पालकमंत्र्यांना जर नामांतराची इतकीच हौस असेल, तर त्यांनी त्यांच्या ‘ट्रम्प टॉवर’चे नाव बदलायला हवे होते, आम्ही त्याचे स्वागतच केले असते," असा खोचक टोला अहिर यांनी लगावला.

पुढे बोलताना अहिर म्हणाले की, सध्या के.ई.एम. रुग्णालयात वैद्यकीय सुविधा अपुऱ्या आहेत. प्रशासनाने नाव बदलण्याऐवजी तिथल्या आरोग्य सुविधा सुधारण्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. 'मार्ड' सारख्या निवासी डॉक्टरांच्या संघटनेनेही या नामांतराला तीव्र विरोध केला असल्याने सरकारने हा प्रस्ताव थेट फेटाळून लावावा, अशी मागणी त्यांनी केली.

आमदार मिलिंद नार्वेकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सुरुवातीला उपरोधिक टोला लगावला. "नार्वेकरांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशीही चांगले संबंध आहेत आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशीही उत्तम सलोखा आहे. त्यांनी सभागृहात हा प्रश्न विचारण्याऐवजी थेट फोनवर संवाद साधला असता किंवा कालसारखे एखादे सुंदर ट्वीट केले असते, तरी हा प्रश्न सुटला असता," असे सामंत म्हणाले.

अंतिम उत्तर देताना मंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले की, किंग एडवर्ड यांच्या देणगीतूनच हे रुग्णालय उभे राहिले हे सत्य असून लोढा यांनी प्रस्ताव पाठवला होता हेही खरे आहे. मात्र, सरकार यावर कोणताही घाईगडबडीत निर्णय घेणार नाही. या प्रस्तावातील सर्व मुद्द्यांची कायदेशीर आणि ऐतिहासिक तपासणी केली जाईल. नाव बदलल्यास रुग्णालयाच्या अंतर्गत प्रशासकीय यंत्रणेवर काय परिणाम होईल, याचाही अभ्यास करावा लागणार आहे. के.ई.एम. च्या नामांतराच्या बाजूने आणि विरोधात अशी दोन्ही बाजूंची निवेदने सरकारकडे आली आहेत. त्यामुळे कोणतीही सामाजिक किंवा कायदेशीर अडचण निर्माण होणार नाही, याची खात्री करूनच पुढील पाऊल उचलले जाईल, असे मंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले.

या गदारोळात भाजप आमदार प्रवीण दरेकर यांनी रुग्णांच्या नातेवाइकांच्या दुरवस्थेकडे सरकारचे लक्ष वेधले. "सध्या रुग्णांचे नातेवाईक रस्त्यावर झोपत आहेत. परळ परिसरात ४ ते ५ मोठी रुग्णालये आहेत, त्यामुळे तिथे ग्रामीण भागातून येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाइकांसाठी राहण्याची योग्य सोय सरकारने करावी. सध्याच्या परिस्थितीत नावापेक्षा रुग्णांना मिळणारी सेवा आणि सुविधा जास्त महत्त्वाच्या आहेत," अशी महत्त्वपूर्ण भूमिका दरेकर यांनी मांडली.

## पावसाळी अधिवेशनात दुसऱ्या दिवशी खडाजंगी



**मुंबई** : महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानभवन परिसरात राजकीय संघर्ष अधिक तीव्र झाल्याचे पाहायला मिळत आहे. महागाई, दुष्काळ, पाणीटंचाई, वीजपुरवठा, ड्रग्सविरोधी कारवाई, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि राज्यातील कायदा-सुव्यवस्थेच्या मुद्द्यांवरून विरोधकांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.

दुसरीकडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांच्या आरोपांना जोरदार प्रत्युत्तर देत सरकार प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्यासाठी सक्षम असल्याचा दावा केला आहे. विधानभवनाच्या पायऱ्यांवरील आंदोलन, सभागृहातील गदारोळ, नेत्यांमधील आरोप-प्रत्यारोप आणि महत्त्वाच्या घोषणांमुळे अधिवेशनाचा दुसरा दिवस चांगलाच गाजत असून राज्यातील राजकीय घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्यात वीजटंचाई आणि लोडशेडिंगबाबत सुरू असलेल्या चर्चादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत मोठा खुलासा केला आहे. राज्यात काही औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्प तांत्रिक कारणांमुळे बंद पडले होते, काही भागांत वीजपुरवठा खंडित झाल्याच्या तक्रारीही समोर आल्या होत्या. मात्र या सर्व परिस्थितीत राज्यात एकाही दिवशी अधिकृत भारनियमन (लोडशेडिंग) करण्यात आलेले नाही, असा ठाम दावा मुख्यमंत्र्यांनी केला.

विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी 'तिहेरी तलाक' , बहुपत्नीत्व आणि 'समान नागरी कायदा' (UCC) या अत्यंत संवेदनशील विषयांवरून सत्ताधारी आणि विरोधी बाकांवरील आमदारांमध्ये मोठी खडाजंगी पाहायला मिळाली. भाजप आमदार देवयानी फरांदे यांनी मांडलेल्या लक्षवेधीवर बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) आमदार सना मलिक यांनी आक्रमक भूमिका घेत "भारतातही कुराणच्या कायद्याची अंमलबजावणी व्हावी" असे विधान केले. यावरून सभागृहात प्रचंड गदारोळ झाला आणि सत्ताधारी पक्षातील वैचारिक दुफळी चव्हाट्यावर आली.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २४ जून २०२६


## चाफा

पाच पाकळ्यांचा चाफा
परस बागेत फुलतो
हवेची झुळूक येता
खुशीत येऊन डुलतो

पूजाअर्चा करतांना
चाफ्याचा मोठा मान
दरवळणाऱ्या गंधाने
हरपते सर्वांचे भान

चाफ्याला शोभून दिसे
पांढरा पिवळा रंग
हिरव्या पानात उमले
नाजूक पाकळ्यांचे अंग

वसंतात येतो बहर
सदाहरित चाफ्याचे झाड
निसर्गाची वाढवी शोभा
होता पूर्ण वाढ

शुभ्र चाफ्याची घालू
लक्ष्मीच्या फोटोला माळ
प्रसन्न वातावरणात
जाईल सुगंधित सकाळ



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## शेतकऱ्यांनो एकच ठरवा!

सर्वांच्या नाड्या तुमच्या हातात,
तरीही तुम्ही का फासावर जावे.
शेतकऱ्यांनो तुम्ही एकच ठरवा,
फक्त आता स्वतःचेच गीत गावे.

बस झालं आता जगाचा विचार,
स्वतःचे आता बदलावे आचार.
राब राब राबून जगासाठी तुम्ही,
कशाला होता रे तुम्ही लाचार.

होऊन जाऊ द्या स्वतःचा विचार,
आता फक्त स्वतःसाठी पेरायचं.
पिकलेला माल नाही विकायच,
आता सर्वांना उपाशीच ठेवायचं.

पैशाने पोट कुणाचे भरणार नाही,
आता हे सगळ्यांना समजू द्यावे.
तुम्ही स्वतःचे हित लक्षात घेऊन,
आता कठोर होऊन निर्णय घ्यावे.

इंगा दाखविल्याशिवाय जगाला,
महत्त्वच तुमचे कळणार नाही.
अन्नधान्य विकणे बंद करताच,
सदा सारे जग उपाशी पोटी राही.

आता होऊन जाऊ द्या एकदा!
स्वतःचे महत्त्व जगाला पटवा.
स्वतःपुरते शेतात पेरून पिकवा,
मोंढ्यातला दलाल कायम हटवा.

**- नागेश बोंतेवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

# दूषित पाणीपुरवठ्याविरोधात पत्रकार संघाचा आंदोलनाचा इशारा




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर शहरातील विविध भागांमध्ये गेल्या काही दिवसांपासून होत असलेल्या दूषित व गढूळ पाणीपुरवठ्याच्या गंभीर प्रश्नावर अखिल भारतीय तालुका मराठी पत्रकार संघ, जिंतूर यांनी सोमवारी नगर परिषद प्रशासनाला धारेवर धरत मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचा आरोप करत तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी संघटनेने केली.शहरातील अनेक प्रभागांमध्ये नळाद्वारे येणारे पाणी गढूळ, दुर्गंधीयुक्त असून त्यामध्ये गाळ, माती तसेच सांडपाणी मिसळत असल्याचा संशय नागरिकांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले असून पिण्याच्या शुद्ध पाण्यासाठी अतिरिक्त खर्च करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.पत्रकार संघाच्या निवेदनात शहरातील जलवाहिन्यांची तपासणी, गळतीची ठिकाणे शोधणे, पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवणे, अहवाल सार्वजनिक करणे तसेच दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.यावेळी पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी अनिल समीद्रे व पाणीपुरवठा शाखेच्या अभियंता मनीषा कोंढेकर यांच्याशी सविस्तर चर्चा केली. नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत प्रशासनाने समस्या गांभीर्याने हाताळण्याचे आश्वासन दिले.चर्चेदरम्यान उपमुख्याधिकारी अनिल समीद्रे व अभियंता मनीषा कोंढेकर यांनी शहरातील पाणीपुरवठा यंत्रणेची तपासणी सुरू असून आवश्यक दुरुस्ती व तांत्रिक उपाययोजना करण्यात येत असल्याचे सांगितले. तसेच येत्या तीन ते चार दिवसांत जिंतूर शहराला स्वच्छ व शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी पत्रकार संघाला दिली.दरम्यान, नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित हा अत्यंत संवेदनशील विषय असल्याने प्रशासनाने दिलेल्या आश्वासनाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते का, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. दूषित पाण्यामुळे संभाव्य आरोग्यधोके टाळण्यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.निवेदनावर पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष बालाजी शिंदे सोसकर,जेष्ठ पत्रकार एम ए मजीद,कार्याध्यक्ष सिराज सिद्दीकी, निहाल अहेमद,अहेमद शेख,रामप्रसाद कंठाळे, मनोज टाक, रियाज चाउस यांच्यासह पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी आहेतचौकट,"स्वच्छ पाणी हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असून त्यात कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही. प्रशासनाने दिलेल्या मुदतीत प्रश्न निकाली न काढल्यास पुढील तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे," असे अखिल भारतीय तालुका मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष बालाजी शिंदे सोसकर यांच्याकडून सांगण्यात आले.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903


# एक तास ५० मिनिटे स्थिर राहून नाव नोंदवले




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** आंतरराष्ट्रीय जागतिक योग दिनानिमित्त येथील शकुंतलाबाई बोर्डीकर महाविद्यालयात २१ जून रोजी योग दिनानिमित्त एक अभूतपूर्व विक्रम नोंदवला गेला. त्यात जिंतूर येथील स्थानिक योगसाधक प्रशांत घीके यांनी योग साधनेतील "विरासन" या आसणांचा एक तास ४६ मिनिटांचा जुना जागतिक विक्रम मोडीत काढत त्याने सलग एक तास ५० मिनिटे कसलीही हालचाल न करता हे आसन टिकून ठेवत नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला व जिंतूरच्या वैभवात मानांचा तुरा रोवला.जिंतूर शहरात गेल्या पाच वर्षापासून योग गुरु परमेश्वर काकडे हे मोफत योग साधना केंद्र चालवत असून त्यांनी नागरिकांना योगाचे महत्त्व पटवून दिले. त्यांचेच प्रेरणेतून प्रशांत घीके आणि त्यांच्या दोन मुली श्रेया व सान्वी सह नियमित योग साधनेचा सराव करत राष्ट्रीय स्तरापर्यंत यश मिळवले आहे. घीके यांच्या यशाबद्दल महाविद्यालयातील प्राचार्य मुटकुळे, परमेश्वर काकडे, नाना काटे, पत्रकार बी.डी. रामपूरकर, संतोष कटारे, प्रा. कापरे प्रा. मते ,रामेश्वर दाभाडे अदिनीं त्यांचे कौतुक केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २४ जून २०२६


## विधवा परित्यक्ता महिलांचं दु:ख बाईनच समजून घ्यावे लागेल

**नाईचाकूर** : विधवा परित्यक्ता महिलांचे दु:ख बाईनच समजून घ्यावे लागेल असे विचार नाईचाकूर तालुका उमरगा या ठिकाणी महिलांना बियानाची मदत कार्यक्रमाच्या प्रसंगी त्या बोलत होत्या. नाम फाउंडेशन आणि त्रिरत्न महिला बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने २३ जून २०२६ रोजी ९८ शेतकरी महिलांना प्रति ३० किलो बियानाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ समाजसेवक भूमिपुत्र वाघ हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. महिला विकास केंद्र नाइचाकूर या ठिकाणी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं होतं.सुरुवातीला महात्मा ज्योतिराव फुले,माता सावित्री यांच्या प्रतिमेचं पूजन करण्यात आलं. एकल महिला दिनानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमाला नाईचाकूर या गावातील एकल महिला,आर्थिक दृष्ट्या दुर्बल महिला यांची उपस्थिती होती. याप्रसंगी अध्यक्ष स्थानावरून भूमिपुत्र वाघ बोलत असताना ते म्हणाले खऱ्या अर्थानी आई ही घर कर्ती आहे आईच्या नजरेतून सामाजिक बदलाचे अनेक उपक्रम घेण्याची गरज आहे.महिलांच्या वरती होणारी हिंसक कमी करणे, शेतकरी महिलांना पुरस्कृत करणे,विधवाना सन्मान आणि प्रतिष्ठा, न्याय देण्यासाठी काम करणे गरजेचं आहे महिलांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराचा बिमोड करणे अशा पद्धतीचे कार्य आपल्या सर्वांना मिळून करायचा आहे. याप्रसंगी प्रत्येक महिलाना बियानाची एक एक बॅग देण्यात आली सोबत लातूर जिल्ह्यातील शिरूर आनंतपाळ, निलंगा आणि उमरगा अशा तीन तालुक्यातील २५० एकल महिला शेतकरी यांना बियाणाची मदत करण्यात आली.या कार्यक्रमाचे आयोजन नाईचाकूर येथील रंजना जमालपुरे, यशोदा पवार, मुक्ता हिंदोळे, सत्यवती इंगळे, नंदा नागणे यांनी केले तर या कार्यक्रमाला ग्रामविकास अधिकारी,गावातील नागरिक महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिंपराळयात महिलांवर उघड्यावर उपचार प्रकरणी चौकशीची मागणी




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : जिंतूर तालुक्यातील पिंपराळा येथे अतिसारसदृश्य आजाराच्या पार्श्वभूमीवर महिला व अन्य रुग्णांना सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर सलाईन व इंजेक्शनद्वारे उपचार करण्यात आल्याच्या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते दिलीप अशोकराव माघाडे आणि परभणी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष केशव बुधवंत यांनी जिल्हाधिकारी परभणी व तालुका आरोग्य अधिकारी, जिंतूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.सादर निवेदनात म्हटले आहे की, 14 जून रोजी पिंपराळा येथे अनेक महिला व इतर रुग्णांना भरदुपारी उन्हात सार्वजनिक ठिकाणी झोपवून वैद्यकीय उपचार करण्यात आल्याचे छायाचित्रे व व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आले आहेत. हे उपचार प्राथमिक आरोग्य केंद्र चारठाणा येथील वैद्यकीय अधिकारी, सीएचओ, आरोग्य सेवक, रुग्ण सेवक, रुग्णवाहिका चालक, आशा वर्कर व इतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे.गावालगत शासकीय आरोग्य सुविधा उपलब्ध असताना रुग्णांना उघड्यावर उपचार देणे हे त्यांच्या सन्मान, गोपनीयता आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने गंभीर बाब असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. भारतीय संविधानातील कलम 21, राष्ट्रीय रुग्ण हक्क सनद, इंडियन पब्लिक हेल्थ स्टँडर्ड्स (IPHS) तसेच वैद्यकीय व्यावसायिक आचारसंहितेचे उल्लंघन झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.या प्रकरणात सार्वजनिक ठिकाणी उपचार करण्याचा निर्णय कोणी घेतला, प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांना दाखल का करण्यात आले नाही, उपचारासाठी निवडलेली जागा अधिकृत होती का, महिला रुग्णांच्या गोपनीयतेसाठी कोणती व्यवस्था करण्यात आली होती, तसेच घटनास्थळी निर्जंतुकीकरण व आपत्कालीन सुविधा उपलब्ध होत्या का, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.जिल्हास्तरीय स्वतंत्र चौकशी समिती नेमून प्रकरणाची सखोल चौकशी करावी, चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांना प्रशासकीय कामकाजापासून दूर ठेवावे, नियमभंग सिद्ध झाल्यास शिस्तभंगाची कारवाई करावी तसेच चौकशी अहवाल सार्वजनिक करावा, अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.दरम्यान, या प्रकरणात तातडीने दखल घेऊन निष्पक्ष कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही दिलीप माघाडे, परभणी जिल्हा परिषद माजी अध्यक्ष केशव बुधवंत यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

## सेनगावच्या वेदांत पुरीची अमरावतीत शैक्षणिक झेप: अभियांत्रिकी द्वितीय वर्षात द्वितीय क्रमांक



**हिंगोली (गोपाल सातपुते)** : गुणवत्तेच्या जोरावर ग्रामीण भागातील विद्यार्थीही मोठ्या शैक्षणिक स्पर्धेत आपला ठसा उमटवू शकतात, हे पुन्हा एकदा सिद्ध करत सेनगाव येथील विद्यार्थी वेदांत जगन्नाथ पुरी याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे.अमरावती येथील पी. आर. पोटे पाटील इंजिनिअरिंग कॉलेज अँड मॅनेजमेंट येथे शिक्षण घेत असलेल्या वेदांतने अभियांत्रिकी द्वितीय वर्षाच्या परीक्षेत ७०० पैकी ६१५ गुण प्राप्त करत महाविद्यालयात द्वितीय क्रमांक मिळविला आहे. त्याच्या या उज्वल यशामुळे सेनगाव शहरासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.वेदांत हा सेनगाव येथील पत्रकार जगन्नाथ पुरी यांचा सुपुत्र असून, सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्तबद्ध नियोजन आणि कुटुंबीयांच्या प्रोत्साहनाच्या जोरावर त्याने हे यश मिळविले आहे.वेदांतच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शैक्षणिक, सामाजिक, पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार तसेच नागरिकांकडून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. आगामी काळातही अशाच प्रकारे प्रगतीची नवी शिखरे गाठावीत, अशा भावना व्यक्त केल्या जात आहेत.ग्रामीण भागातून उच्च शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या वेदांत पुरीच्या कामगिरीमुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत आहे.

## कै. सुमनबाई नानासाहेब भोसले यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप




**दाभाडी** : मौजे दाभाडी येथील स्व. नानासाहेब दिनकरराव भोसले सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने कै. श्रीमती सुमनबाई नानासाहेब भोसले यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त जिल्हा परिषद शाळा, दाभाडी येथे विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.पुण्यस्मरण दिनानिमित्त सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने जिल्हा परिषद शाळेत शुद्धलेखन व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केली. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व 60 विद्यार्थ्यांना वाचनालयाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.याप्रसंगी कै. श्रीमती सुमनबाई नानासाहेब भोसले यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती सदस्य श्री. मुक्तार शहा, दाभाडीच्या सरपंच सौ. अखिला बी. मुक्तार शहा तसेच गावातील मान्यवर उपस्थित होते.बक्षीस वितरण समारंभप्रसंगी श्री. मुक्तार शहा यांनी आपल्या मनोगतातून स्व. नानासाहेब भोसले उर्फ आबा यांच्या सामाजिक कार्याच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच आबांच्या खांद्याला खांदा लावून सुमनबाई (अक्का) यांनी गावातील गरजू व विविध घटकांतील नागरिकांना केलेल्या सहकार्याचा उल्लेख केला.यावेळी उपस्थित ग्रामस्थांनीही कै. सुमनबाई भोसले यांना श्रद्धांजली वाहिली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रंथालय कर्मचारी मुनिरा शहा मॅडम, सहशिक्षिका सौ. सोनाली जाधव मॅडम व ग्रंथपाल संतोष देशमुख यांनी प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली परिश्रम घेतले.कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिक सोमनाथ क्षीरसागर, अशोक गायकवाड, बाळू निकम, संतोष आदिक, शिवाजी आदिक, वंदना निकम, शशिकला आदिक, भारत विटेकर, विकास आदिक, सदाशिव लोखंडे आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. डॉ. अतिश मेहेत्रे यांनी केले, तर प्रास्ताविक ग्रंथपाल संतोष देशमुख यांनी केले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २४ जून २०२६


## नितिन चंदनशिवेंच्या 'कांबळे' कवितेने केले महाराष्ट्रावर गारूड

शिवसेना ऊबाठा गटाचा वर्धापन दिन हा केवळ झेंडे, घोषणा आणि शक्तिप्रदर्शनाचा सोहळा नसतो. तो पक्षाच्या जन्मकाळापासून अंगी बाणलेल्या विद्रोही स्वभावाचा, तळागाळातील माणसाशी असलेल्या नाळेचा आणि व्यवस्थेला प्रश्न विचारण्याच्या धाडसाचा पुनरुच्चार असतो. यंदा झालेल्या वर्धापन दिन सोहळ्यात हेच मूळ तत्व पुन्हा एकदा अधोरेखित झालं. आणि त्या सोहळ्याला खरी धार आली ती लोकप्रिय विद्रोही कवी नितिन चंदनशिवे यांच्या 'कांबळे' या कवितेमुळे. व्यासपीठावरून उमटले शब्द केवळ टाळ्यांचा कडकडाट घेऊन गेले नाहीत, तर हजारो शिवसैनिकांच्या काळजात घर करून गेले.### भगव्या सभागृहातील ती क्षणभंगुर शांततासोहळ्याला सुरुवात झाल्यापासूनच सभागृहात उत्साह ओसंडून वाहत होता. नेत्यांची भाषणं, कार्यकर्त्यांच्या घोषणा, पक्षाच्या वाटचालीचा आढावा... सगळं सुरळीत सुरू होतं. पण जेव्हा निवेदकाने "आता व्यासपीठावर आहेत, सांगलीचे लोकप्रिय विद्रोही कवी नितिन चंदनशिवे" असं पुकारलं, तेव्हा माहोल एका क्षणात बदलला. कार्यकर्त्यांना माहित होतं की आता रटाळ आकडेवारी किंवा औपचारिक भाषण ऐकायला मिळणार नाही. आता ऐकायला मिळणार आहे ती थेट दंगल.चंदनशिवे व्यासपीठावर आले. अंगावर खादीचा सदरा, खांद्यावर बोलीभाषेची ठसठशीत लय आणि डोळ्यात व्यवस्थेला भिडण्याची जिद्द. त्यांनी कागद हात घेतला नाही. त्यांना कागदाची गरजच नव्हती. कारण त्यांची कविता त्यांच्या श्वासात, त्यांच्या गावात, त्यांच्या माणसात जगते.### नितिन चंदनशिवे: विद्रोहाचा बुलंद आवाजनितिन चंदनशिवे हे महाराष्ट्रातील विद्रोही कवितेचं एक जिवंत नाव आहे. 'दंगल' ही त्यांची गाजलेली कविता ग्रामीण महाराष्ट्रात आजही तोंडपाठ आहे. ते शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी, मजुरांची पिळवणूक, आदिवासींची विस्थापना, भटक्या विमुक्तांची उपेक्षा या विषयांवर लिहितात. त्यांची भाषा अलंकारिक नाही. ती सांगलीच्या मातीतली, बाजारातल्या गर्दीतली, शेताच्या बांधावरची भाषा आहे. खणखणीत, थेट आणि चाबकासारखी.चंदनशिवे यांच्या कवितेत उपरोध आहे, व्यंग आहे, पण सर्वात जास्त आहे तो माणुसकीचा कळवळा. म्हणूनच त्यांना केवळ विद्रोही कवी न म्हणता मानवतावादी कवीही म्हटलं जातं. काळजातून आले शब्द ते मनापर्यंत पोहोचवतात. म्हणूनच प्रस्थापित साहित्य संस्थांनी त्यांना कितीही दुर्लक्ष केलं तरी गावखेड्यातील सामान्य माणूस त्यांना डोक्यावर घेतो.### 'कांबळे': उपेक्षितांचा जिवंत रूपकवर्धापन दिनाच्या व्यासपीठावर चंदनशिवे यांनी सादर केलेली 'कांबळे' ही कविता वरवर पाहता एखाद्या वस्तूवर आहे असं वाटेल. पण खरी गोष्ट अशी आहे की ही कविता वस्तूवर नाही, माणसावर आहे.'कांबळे' या शब्दाला प्रतीक बनवून कवीने शेतकरी, मजूर, बांधकाम कामगार, भटका विमुक्त, आदिवासी, हमाल, मोलकरीण या सगळ्यांची कहाणी मांडली. हे लोक रात्रंदिवस राबतात. उन्हाळा असो, पावसाळा असो, हिवाळा असो... ते थांबत नाहीत. ते देशाला अन्न देतात, शहरं उभी करतात, व्यवस्था चालवतात. पण जेव्हा त्यांच्यावर संकट येतं तेव्हा व्यवस्था त्यांच्यासाठी थांबत नाही. उलट त्यांनाच वाऱ्यावर सोडून देते.कवितेतली सर्वात मार्मिक ओळ होती — "इथे 'कांबळे' म्हणजे उपेक्षित माणूसच." कांबळं फाटलं तरी चालतं, ओलं झालं तरी चालतं, धुळीनं माखलं तरी चालतं. पण माणूस फाटला की संपतो. ही ओळ ऐकताच सभागृहात काही क्षणांसाठी पूर्ण शांतता पसरली. कारण ही ओळ आरसा होती. आणि तो आरसा अनेकांना स्वतःचं प्रतिबिंब दाखवून गेला.सांगलीच्या बोलीतील लय, आवाजातील चढ-उतार, वाक्यांमध्ये येणारा थेटपणा आणि लोकभाषेचा प्रभावी वापर यामुळे कविता केवळ ऐकली गेली नाही, तर अनुभवली गेली. मध्येच घोषणा उमटल्या, मध्येच टाळ्यांचा कडकडाट. आणि शेवटी 'पुन्हा एकदा'च्या आरोळ्यांनी सभागृह दणाणून गेलं.### प्रेक्षक, नेते आणि सोशल मीडियाची प्रतिक्रियाकविता संपल्यावर क्षणभर सभागृह स्तब्ध झालं. मग टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. शिवसैनिकांच्या चेहऱ्यावर दिसणारा भाव सांगत होता की ही त्यांच्या घरची कहाणी आहे. अनेकांचे डोळे पाणावले होते. मंचावर बसलेल्या वरिष्ठ नेत्यांनीही विशेष कौतुक केलं. एका नेत्याने तर उघडपणे म्हटलं, "आम्हाला भाषणकार नको. आम्हाला चंदनशिवेसारखे विद्रोही कवी हवेत, जे मंचावरून जनतेचं खरं दुःख मांडतात. हेच खरं शिवसेनेचं भाषण आहे."कार्यक्रम संपल्यावर अवघ्या काही तासांत 'कांबळे कविता — नितिन चंदनशिवे' या नावाने व्हिडिओ क्लिप्स सोशल मीडियावर व्हायरल झाल्या. युट्युब, फेसबुक, व्हॉट्सॲपवर शेअरचा पाऊस पडला. कमेंट बॉक्समध्ये एकच सूर होता — "हे शब्द थेट काळजाला भिडले", "हेच खरं शिवसेनेचं भाषण", "अशा कवींना व्यासपीठ मिळालं पाहिजे".### या सादरीकरणाचं राजकीय आणि सांस्कृतिक महत्त्वया घटनेचं महत्त्व केवळ एका कवितापुरतं मर्यादित नाही. त्याचे काही खोल अर्थ आहेत.पहिलं म्हणजे, राजकीय मंचावर विद्रोही कवितेला जागा मिळणं हे दाखवतं की पक्ष अजूनही तळागाळाशी जोडलेला आहे. मोठे नेते, मोठी भाषणं यांच्या गर्दीत एका लोककवीला केंद्रस्थानी आणणं म्हणजे पक्षाची दिशा स्पष्ट करणं.दुसरं म्हणजे, 'दंगल'पासून 'कांबळे'पर्यंत चंदनशिवे सातत्यानं व्यवस्थेवरील असंतोषाला शब्द देत आहेत. त्यांच्या कविता कधीही सत्ताधारी किंवा विरोधी यापुरत्या मर्यादित राहत नाहीत. त्या व्यवस्थेला प्रश्न विचारतात.तिसरं म्हणजे, आकडे, आकडेवारी आणि धोरणांपेक्षा 'कांबळे' सारखं रूपक लोकांच्या लक्षात राहतं. राजकारणात लोकांना प्रेरणा देण्यासाठी कथा लागतात, प्रतिमा लागतात. चंदनशिवेंची कविता ती प्रतिमा देऊन गेली.### उपेक्षित कवी, पण महाराष्ट्राचा कवीविशेष बाब म्हणजे चंदनशिवे हे आजपर्यंत प्रस्थापित साहित्य संस्थांनी उपेक्षित ठेवले कवी आहेत. त्यांनी पायाला भिंगरी बांधून महाराष्ट्रभर गावोगावी कविता नेली. अनेक व्यासपीठे, संमेलने, चळवळी त्यांनी गाजवल्या. पण साहित्य वर्तुळात त्यांना फारशी दखल मिळाली नाही.काल झालेल्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात मात्र त्यांच्या सादरीकरणाने अक्षरशः शिवसैनिकातील नैराश्य झटकले. चौफेर फटकेबाजी करून त्यांनी व्यासपीठ गाजविलं. महाराष्ट्राने त्यांचं सादरीकरण डोळ्यात तेल ओतून पाहिलं, ऐकलं.हे एक मोठं संकेत आहे. तेच तेच नेते, तेच तेच चेहरे, तीच रटाळ भाषणं... यातून पक्षाला नवी ऊभारी मिळत नाही. नवे चेहरे, नवे आवाज, नवे प्रश्न घेऊन येणारे लोक हेरले पाहिजेत. विविध चळवळीत काम करणारे कार्यकर्ते, गावखेड्यातील कवी, लेखक, कलावंत यांना संधी दिली तरच महाराष्ट्राचा माहोल बदलेल.### कवी म्हणून माझं मतएक कवी म्हणून मी नितिन चंदनशिवेंचं मनःपूर्वक अभिनंदन करतो. आज ज्या काळात जातीयवादाची बीजं ठिकठिकाणी पेरली जात आहेत, त्या काळात हा कवी मानवतावादाची पेरणी करतो आहे. शोषितांच्या वेदनेला शब्द देतो आहे. कविता गावखेड्यापर्यंत घेऊन जात आहे.हा केवळ व्यासपीठीय कवी नाही. हा विद्रोहाची ठिणगी आहे. आणि हा सकारात्मक विद्रोहच शोषितांच्या लढ्याला बळ देईल. चंदनशिवेंच्या शब्दात अंगार आहे. हाच अंगार गावखेड्यात फिरला तर महाराष्ट्राचं लोकजीवन ढवळून निघेल.वर्धापन दिनाचे सोहळे अनेक होतात. पण काही वेळा एखादी कविता संपूर्ण माहोल बदलून टाकते. नितिन चंदनशिवेंच्या 'कांबळे' ने हेच केलं. शिवसेना ऊबाठासाठी हा सोहळा केवळ वर्धापन दिन नव्हता, तर 'आम्ही अजूनही उपेक्षित, वंचितांच्या बाजूला आहोत' याचा पुनरुच्चार होता. आणि सांगलीच्या बोलीतील लोकप्रिय विद्रोही कवी नितिन चंदनशिवे यांनी त्या पुनरुच्चाराला शब्दांची धार दिली.

- डॉ. शिवाजी हुसे

## विराट राष्ट्रीय लोकमंच कौन्सिलचे शेख नईम शेख लाल यांचा आरोप



**हिंगोली (गोपाल सातपुते) :** महाराष्ट्र शासनाने १२ जून २०२६ रोजी अधिसूचित केलेल्या महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २०२६ मधील अनेक तरतुदी माहिती अधिकार अधिनियम २००५ शी विसंगत असून नागरिकांच्या माहितीच्या मूलभूत अधिकारावर गदा आणणाऱ्या असल्याचा आरोप करत विराट राष्ट्रीय लोकमंच कौन्सिल (VRLMC), हिंगोली यांच्या वतीने मुख्यमंत्री, राज्यपाल, मुख्य सचिव, मुख्य माहिती आयुक्त व संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.निवेदनात अर्ज व अपील शुल्कातील वाढ, ओळखपत्र सक्ती, १५० शब्दांची मर्यादा, एका अर्जात एकच विषय, डिजिटल माहितीवरील शुल्क तसेच वेबसाईटवर माहिती उपलब्ध असल्याचे कारण देऊन माहिती नाकारण्याच्या तरतुदींना विरोध करण्यात आला आहे.संस्थेने महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २०२६ तात्काळ स्थगित करून रद्द करावेत, वाढीव शुल्क मागे घ्यावे, नागरिकांवरील अतिरिक्त अटी हटवाव्यात व RTI कार्यकर्ते, पत्रकार, सामाजिक संस्था व कायदेतज्ज्ञांशी चर्चा करून नियमांचा पुनर्विचार करावा, अशी मागणी केली आहे.निवेदनावर VRLMC चे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष शेख नईम शेख लाल, राष्ट्रीय संचालक शेख नौमान नवेद नईम, जिल्हाध्यक्ष शेख बासित, उपाध्यक्ष रवी जैस्वाल, प्रमुख महासचिव शेख शाहनवाज हुसेन, महासचिव सतीश लोणकर, शहराध्यक्ष पठाण साजिद खान व अन्य पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २४ जून २०२६



प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903


# भविष्यामध्ये तुमची मान उंचावेल असे काम करीन - आ. पाटील




**धाराशिव (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** धाराशिव-बीड-लातूर या स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये एवढे मोठे यश मिळाले आहे. या ऐतिहासिक यशामुळे मी बाराहून गेलो असून हा विजय मी अतिशय नम्रपणे मिळालेला आहे. तसेच हा विजय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्राताई पवार रिपाई नेते तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्यासह महायुतीतील घटक पक्ष सर्व मतदार व कार्यकर्ते यांना हा विजय मी समर्पित करतो. हे मतदान मला नव्हे तर विकासाला दिले आहे कारण देवा भाऊंच्या नेतृत्वाखाली विकासाची जी गोड गोड सुरू आहे. ती सगळ्या क्षेत्रात विकासाची आघाडी घेतलेली आहे. त्यामुळे यापुढील काळात संपूर्ण महाराष्ट्र शेत प्रतिशत भाजप झाल्याशिवाय राहणार नाही असे ठाम प्रतिपादन स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत ऐतिहासिक विजय संपादन केलेले आमदार बसवराज पाटील यांनी दि.२२ जून रोजी केले. दरम्यान, बसवराज पाटील यांचा महायुती घटक पक्षांच्यावतीने जंगी सत्कार करण्यात आला.भाजप महायुतीचे धाराशिव-बीड-लातूर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत बसवराज पाटील यांचा ऐतिहासिक विजय झाल्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या जाहीर आभार सभेत ते बोलत होते. यावेळी भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, सरचिटणीस माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, धाराशिव जिल्हा बँकेचे चेअरमन तथा मुरुम नगर परिषदेचे नगराध्यक्ष बापूराव पाटील, जस्ट नेते रामकृष्णपंत खरोसेकर, दिलीप भालेराव, युवा नेते मल्हार पाटील, शरण पाटील, भाजपचे मराठवाडा समन्वयक नितीन काळे, सुनील चव्हाण, ऍड अनिल काळे, आमदार अभिमन्यू पवार यांचे प्रतिनिधी परिक्षीत पवार, लातूरचे राम तिरुके, मधुकर तावडे, ऍड वेंकट गुंड, कलबुर्गे, सुभाष जाधव, शेखर सोनवणे, नळदुर्ग चे नगराध्यक्ष बसवराज धरणे, बाळासाहेब पाटील, फुलचंद गुंडुरे, सचिन देवगिरे, स्वप्निल व्हते, प्रकाश आष्टे, बसवराज धाराशिवे, विठ्ठल बदोले, शहा बर्फीवाले, विजयकुमार सोनवणे युवराज बिराजदार, ऍड लक्ष्मीकांत पाटील आदींसह इतर पदाधिकारी उपस्थित होते. पुढे बोलताना बसवराज पाटील म्हणाले की, ही निवडणूक एक लोकशाही मार्गाने अतिशय चांगल्या प्रकारे पार पडलेली आहे. या निवडणुकीमध्ये प्रत्येक कार्यकर्त्यांचा सहभाग होता या लोकशाहीच्या उत्सवांमध्ये सर्वजण आनंदाने सहभागी झाले व एका चांगल्या विचाराने ही निवडणूक यशस्वी केली असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच धाराशिव बीड व लातूर या तिन्ही जिल्ह्यातील ही निवडणूक असून १८ आमदार व ३ खासदार, ९८८ नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य यांचे प्रतिनिधित्व करते. विकासाची घोडदौड सुरू असून प्रत्येकाला विकास हवा आहे. स्पर्धेच्या युगात प्रत्येक जण विकासाला प्राधान्य देत असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे उद्याचा महाराष्ट्र सुजला आणि सुफलाम दिसला पाहिजे असे सांगत ते म्हणाले की तिन्ही जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी ही निवडणूक चांगली व्हावी यासाठी प्रयत्न करून चांगला संदेश दिला असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक कार्यकर्ता व मतदारांनी आम्हीच उमेदवार आहोत अशा भावनेने काम केले असल्याचे नमूद केले. विशेष म्हणजे मंत्री बाबासाहेब पाटील, पंकजाताई मुंढे, आमदार सर्वश्री राणा जगजीतसिंह पाटील, संजय बनसोडे, सुरेश धस, धनंजय मुंढे, अक्षय क्षीरसागर यांच्यासह अमरसिंह पंडित यांच्यासह महायुतीतील सर्व घटक पक्षांच्या आजी-माजी आमदार खासदार लोकप्रतिनिधी मतदार व पदाधिकाऱ्यांनी ही नियोजन करून हा विजय संपादन केला त्याबद्दल सर्वांचे त्यांनी आभार मानले. बीड जिल्ह्याला मुजरा करतो तर धाराशिव हा जिल्हा प्रेम करणारा असून जिल्हा परिषदेमध्ये माझी जडणघडण झाली आमदार राणाजगजितसिंह पाटील व सर्व सहकाऱ्यांनी मला सहकार्य केले त्याबरोबरच लातूरचा जिल्हाध्यक्ष म्हणून काम केले एक वेगळाच आनंद मिळाला व तेथील लोकांनी मला समजून घेतल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. सध्या मराठवाड्यात विकासाचे वारे वाहत असून विकासाची केंद्र, राज्य, जिल्हा परिषद ते ग्रामपंचायत ही साखळी मजबूत झाले पाहिजे व सर्व प्रश्न सुटले पाहिजेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. विशेष म्हणजे मला राजयोग तर आहेच शिवाय निसर्गाची साथ सुद्धा मिळालेली असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे आमदार अभिमन्यू पवार यांच्या विरोधात मी निवडणूक लढवली त्यामध्ये मला पराभव पत्करावा लागला. तसेच मी विरोधी पक्षात असताना सुरेश धस यांना आमदार केले. तर आता आम्ही तिघेही आमदार झालो असल्याचे त्यांनी सांगताच उपस्थितानी टाळयांचा कडकडाट प्रतिसाद दिला. भाजप महायुतीची मला उमेदवारी मिळणे ही मी माझे भाग्य समजतो आता माझी जबाबदारी अधिक वाढलेली असून आज पर्यंत माझ्या हातून चूक होऊ दिली नाही भविष्यामध्ये तुमची मान उंचावेल असे काम करीन असे सांगत मिळालेल्या संधीचे नक्कीच सोने केल्याशिवाय राहणार नसल्याचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी रामचंद्र तिरुके, दत्ता कुलकर्णी, नितीन काळे यांनी आपले विचार मांडले. प्रस्ताविक व सूत्रसंचालन जिल्हा सरचिटणीस ऍड नितीन भोसले यांनी तर उपस्थितांचे आभार ऍड अनिल काळे यांनी मानले. यावेळी भाजप महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते..........

सुजितसिंह ठाकूर म्हणाले की, महा विकास आघाडीच्या एका नेत्याचा मला फोन आला, तुम्हाला आमच्या उमेदवाराला भेटायचे आहे. तुमचे आशीर्वाद आमच्या उमेदवाराला द्यावेत, असे त्या नेत्याने सांगितले. त्यावर मी त्यांना नकार दिला असे सांगत ते म्हणाले की, या निवडणुकीमध्ये लातूरच्या देशमुख यांना उमेदवारी मिळाली असती तर खरी लढत झाली असती असे सांगत ते म्हणाले की, पडायला सर्वसामान्य उमेदवार व विजयी व्हायला तुम्ही का ? असा प्रश्न नाव न घेता काँग्रेस नेते आमदार अमित देशमुख यांना त्यांनी विचारला. बसवराज पाटील यांनी महायुतीच्या मतापेक्षा खूप अधिक मते घेऊन विक्रम केला आहे. मराठवाड्याच्या हक्काचे मराठवाडा सिंचन प्रकल्पाचे १६.६६ टीएमसी हक्काचे पाणी आणण्यासाठी पाटील यांनी सभागृहात आवाज उठवावा अशी मागणी त्यांनी केली. बसवराज पाटील यांना ही मते मिळाली असली तरी ती माहितीतील नेत्यामुळे नव्हे तर बसवराज पाटील यांच्यामुळे ते विक्रमी मताधिक्य मिळाले असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. भाजप हा पक्ष सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा असून सामान्य कार्यकर्ता मोठा होण्याचे काम भाजप करीत आहे. त्यामुळे नवा जुना असा वाद फोन करीत असेल तर त्याला बाजूला टाकण्याचे काम या पक्षात केले जात असल्याचे सांगत ते म्हणाले की, बसवराज पाटील यांच्या रूपाने आपल्याला विकासा भूमिक नेता लाभला असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे बसवराज पाटील व आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा शत प्रतिशत भाजप होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# ३२ वर्षानंतर "लाड" कसे पुरवता येतील ? जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांचा सवाल

**दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाच्या माधुरी पाटील विरुद्ध अतिरिक्त आयुक्त आदिवासी विकास ठाणे या प्रकारणातील २ सप्टेंबर १९९४ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या घटना पीठाचा निर्णय झाला आहे.याला आता ३२ वर्षा पेक्षा जास्त कार्यकाळ संपलेला असल्यामुळे ३२ वर्षानंतर " लाड " कसे पुरवता येतील ? असा महत्वाचा कायदेशीर व घटनात्मक सवाल राज्य शासनाच्या एका प्रतिनिधीने मराठवाड्या तील आरक्षणा बाबत केंद्र शासनाच्या सॉलिसीटर जनरल कडे विचारणा केल्यावर अंतिम निर्णय घेतला जाईल या अनुषंगाने जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी ही घटनात्मक त्रुटीची बाब पहिल्यां दाच पुढे आणली आहे.मराठा आरक्षण एस ओ पी व नविन शासनादेश या बाबत आपले मत व्यक्त करतांना ते म्हणाले की,माधुरी पाटील या प्रकरणाचा न्यायनिवाडा सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापिठाने केलेला आहे या निर्णयात अर्जदार यांची वंशावळ महसूल पुराव्या आधारे आणि संपूर्ण नावाच्या आधारे जोडणारी असावी ही बाब महाराष्ट्र शासनाला मराठा आरक्षण देताना अडचणीची ठरत आहे म्हणून माधुरी पाटील या प्रकरणातील न्याय निवाडा बदलणे किंवा त्यामध्ये काही एक दुरुस्ती करण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेने राज्य शासनाला राज्याच्या विधानसभेला किंवा राज्याच्या विधान परिषदेला दिलेला नसल्यामुळे राज्य शासनाने एसओपी किंवा जीआर च्या आधारे या न्याय निवाडा बदलणे म्हणजे हा न्याय निवाडा अमान्य करुन त्यातील आदेश व निर्देश परस्पर बदलणे असे सिद्ध होऊन हा सन्माननीय घटना पिठाचा अवमान ठरू शकतो म्हणून माधुरी पाटील या प्रकरणातील न्याय निवाड्यातील आदेश दुरुस्त(मॉडीफाय) करून घेता येईल काय ?याची कायदेशीर माहिती भारताच्या सॉलिसीटर जनरल यांचे कडुन घेणार असल्याचे वक्तव्य शासनाच्या प्रतिनिधीने नुकतेच माध्यमा समोर केले आहे. कायदेशीर व घटनात्मक वेगळेच आहेत माधुरी पाटील न्यायनिवाडा आणि या निर्णया विरुद्ध (पुर्नविचार याचीका ) दाखल करणे कायदेशीर रित्या शक्य आहे, परंतु त्या साठी अत्यंत मर्यादित कारणे असणे आवश्यक आहे आणि महाराष्ट्र शासन राज्यात स्वतःचा वेगळा कायदा करू शकते काय? घटनेतील परिच्छेद ३६८ घटना दुरुस्तीचा अधिकार फक्त भारतीय संसदेस म्हणजेलोकसभा - राज्यसभेस आहे. यातील महत्वाची बाब आणि निष्कर्ष असा आहे की,राज्य शासनास घटनापीठाच्या निर्णया नुसार कार्यवाही करणे बांधन कारक आहे. निर्णय रद्द करण्यासाठी फक्त संसद घटनादुरुस्ती करू शकते, पण राज्य शासन स्वतःहून निर्णय बदलू शकत नाही किंवा घटनापीठाच्या निर्णयाला बदलण्याचा अधिकार फक्त सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णय दिलेल्या घटनापीठा पेक्षा मोठ्या घटना पीठास आहे जसे पाच न्यायधिशांच्या घटना पीठा पेक्षा मोठे सात -त्या पेक्षा मोठे नऊ -त्या पेक्षा मोठे अकरा -त्या पेक्षा मोठे घटनापीठ हे तेरा न्यायधिशांचे असावे लागते यांचे उदाहरण द्यायचे असेल तर स्वामी केशवानंद भारती विरुद्ध भारत सरकार हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाच्या सन्माननीय १३ न्यायधिशांच्या घटनापीठा समोर सुनावणीस होते. आणि पूर्वीचा निर्णय ज्या घटना पीठा समोर झाला असेल त्या पेक्षा मोठे घटनापीठ(लार्जर बेंच) स्थापना सी जे आय म्हणजे भारताचे सर न्यायाधीशच करू शकतात. त्यामुळे राज्य शासनास असा काही एक कायदेशीर व घटना त्मक अधिकार मुळातच नाही.म्हणजेच राज्यघटनेत बदल/दुरुस्ती करण्याचा अधिकार परिच्छेद ३६८ प्रमाणे फक्त संसदेस आहे तो अधिकार विधिमंडळाला किंवा राज्य शासनाला अजिबात नाही.महत्त्वपूर्ण असे आहे की रिव्हिव पिटीशन न्यायालया च्या निर्णयाची पुनर्वाद करण्यासाठी नाही,तर फक्त स्पष्ट त्रुटी दुरुस्त करण्यासाठी आहे या साठी वेळेची मर्यादा असुन रिव्हिव पिटीशन ही निर्णय झालेल्या तारखेपासून ३० दिवसांत दाखल करावी लागते असे सामान्य कायदेशीर नियम आहेत.१९९४ चा निर्णय असल्याने,गेल्या ३२ वर्षा पेक्षा जास्त झालेल्या वर्षांत याचिका दाखल करण्याची वेळ संपली आहे क्युरेटिव्ह पिटीशन जर पुनर्वीचार याचीका खारिज झाली असेल,तरचउपचारात्मक याचीका दाखल करता येते, परंतु फक्त गंभीर न्याय्य व्यतिक्रम (ग्रेव्ह मीस कॅरेजेस ऑफ जस्टिस) असल्यास नैसर्गिक न्यायचे उल्लंघन असल्यास हा अंतिम उपाय आहे,परंतु १९९४ पासून ३२ वर्षापेक्षा पेक्षाही जास्त वर्षे झालेली असल्यामुळे उपचारा त्मक याचीका दाखल करण्याची वेळही संपली आहे त्यामुळे आमचे सातत्याने असलेले अभ्यासपुर्ण निवेदनच सतत सत्य ठरलेले असल्यामुळे कायद्या समोर किंवा घटनात्मक तरतुदी मध्ये कोणतेही "लाड" चालत नाही हे अंतिम सत्य सर्वांना मान्यच करावे लागेल अशी महत्वाची कायदेशीर व घटनात्मक बाब जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी पुढे आणली आहे. हीच बाब त्यांनी गेली अनेक वर्षे सातत्याने विविध आयोग यांचे समोर मांडलीअसुन अगदी याच वर्षी दस्तूर खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील व राज्य शासना च्या प्रशासनिक अधिकारी यांचे समक्ष १८६ स्लाईड असलेले विविध न्याय निवाडे, त्यात दिलेले निर्णय अनुक्रमांक निहाय आणि पान निहाय हाय लाईट केलेले पी पी टी (पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन ) द्वारे अंत्यन्त अभ्यासु मांडणी केलेली असल्यामुळे शासनास काहीच माहीत नाही?हे म्हणताच येणार नसुन आम्ही या बाबत ज्यांचे कडे पुरावे आहेत त्यांना कुणबी प्रमाणपत्र देणे व ज्यांचे कडे पुरावे नाही त्या मराठा समाजा साठी स्वतंत्र आरक्षण कसे देता येईल यांचे कायदेशीर व घटनात्मक विश्लेषण सुद्धा दस्तूर खुद्द मुख्यमंत्री व समितीचे अध्यक्ष यांचे समोर सादर केलेले आहे.१९९४ निर्णया विरुद्ध नवीन अर्ज दाखल करण्याची शक्यता अत्यंत रेअर म्हणजे कमी आहे






## श्री. राजेश मुंढे यांची महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या सांस्कृतिक सेलच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी नियुक्ती



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष मा. श्री. हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार छत्रपती संभाजीनगर येथील काँग्रेसचे श्री. राजेश पंढरीनाथ मुंढे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सांस्कृतिक सेलच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन ही नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. मुंढे यांनी यापूर्वी विविध सामाजिक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच जनसंपर्काच्या माध्यमातून काँग्रेस पक्षाची विचारधारा जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.या नियुक्तीमुळे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सांस्कृतिक सेलला अधिक बळकटी मिळणार असून राज्यभरातील सांस्कृतिक उपक्रमांना नवी दिशा मिळेल, असा विश्वास पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.श्री. राजेश मुंढे यांच्या नियुक्तीबद्दल काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २४ जून २०२६


# कुहीनट

कुहीनट स्वभावाची मोठी गंमत असते,
स्वतः चुकूनही दुसऱ्यालाच शिक्षा असते.

तोंडावर गोड बोलतो,
स्वतः मनात विष पेरतो,
आपल्या माणसांनाच हळूहळू दूर करतो.

प्रत्येक गोष्टीत त्याला संशय दिसतो,
नसलेल्या वादालाही तोच जन्म देतो.
कळतनकळत नाती तो सहज तोडतो,
वेळोवेळी चेहराही बदलतो.

सत्याचा प्रकाश त्याला कधीच रुचत नाही,
खोटेपणाची सावली मात्र सोडत नाही.
दुसऱ्याचे सुख पाहून मन त्याचे जळते,
मत्सराच्या आगीत आयुष्यच करपते.

कुहीनट स्वभावाच्या माणसाला प्रत्येक चेहरा खोटा वाटतो
कारण स्वतःच्या मनातील कापटाचा आरसा त्याला जगात दिसतो.

कुहीनट स्वभावाची माणसं कधीच होत नाहीत कोणाच्या
सुखदुःखात सहभागी
मीच बरोबर तो त्याचा जहागिरदार मी आपला अभागी

कुहीनट स्वभावाने घरही उद्ध्वस्त होते,
कुहीनटाचे झाड नकळत मुळासकट उपटते.

म्हणून स्वभावात माणुसकीचा सुगंध ठेवा,
प्रेम, विश्वास, आपुलकीचा दिवा तेवत ठेवा.
कारण संपत्तीपेक्षा स्वभाव मोठा असतो,
चांगल्या स्वभावामुळेच माणूस माणसात जगत असतो.॥





- डॉ. बाळासाहेब लिहिणार







# एकल महिलांचे सक्षमीकरण : समाज, शासन आणि आपली सामूहिक जबाबदारी




समाजाची रचना ही स्त्री आणि पुरुष या दोन समान महत्त्वाच्या घटकांवर आधारलेली आहे. ही रथाची दोन चाके जर समतोलपणे चालली तरच प्रवास सुखकर आणि सहज होतो.सोबतीने अनेक गोष्टी साध्य करता येतात.त्याचप्रमाणे स्त्री आणि पुरुष यांचा परस्पर सन्मान, सहकार्य आणि सहभाग या गोष्टीवर कुटुंबव्यवस्था व समाजव्यवस्था उभी आहे .भारतीय संस्कृतीत विवाह हा व्यक्तीच्या जीवनातील अविभाज्य घटक आहे.विवाहसंस्था ही केवळ दोन व्यक्तींच्या नात्यापुरती मर्यादित नसून दोन कुटुंबांचे, दोन विचारांचे आणि दोन जीवनप्रवाहांचे एकत्रीकरण आहे . वैवाहिक जीवनामध्ये प्रेम, विश्वास, जबाबदारी, संततीनिर्मिती, मुलांचे संगोपन, सामाजिक कर्तव्ये आणि भावनिक आधार या अनेक बाबींचा समावेश होत असतो . परंतु जीवनाचा प्रवास नेहमीच अपेक्षेप्रमाणे घडेल असे नाही. काही अनपेक्षित घटना, संकटे आणि आघात अचानकपणे येतात आणि यामुळे जीवनाचा मार्ग बदलतात.कधी पतीचे निधन, घटस्फोट, विवाह न होणे किंवा इतर कोणत्याही कारणांमुळे अनेक महिलांना एकाकी जीवन जगण्याची वेळ येते. अशावेळी स्त्रियांना आयुष्य एकटेपणाची शिक्षा देते तरीही त्यातून स्वतःची ओळख नव्याने घडवण्याची संधी म्हणून पाहिले पाहिजे आणि ही संधी मिळण्यापूर्वी त्यात वेदना, संघर्ष, अश्रू आणि असंख्य प्रश्नांच्या वादळातून जावे लागते. एकल होणे ही कोणाची निवड असू शकत नाही तर ती अनेकदा परिस्थितीची अपरिहार्यता आहे .मात्र त्या परिस्थितीला शरण जाण्यापेक्षा तिच्यावर मात करून उभे राहणे हा खरा संघर्ष आहे. म्हणून एकटेपणा हा केवळ सामाजिक किंवा कौटुंबिक प्रश्न नाहीय तर तो मानसिक, भावनिक, आर्थिक आणि कायदेशीर परिणाम घडवणारा गंभीर विषय आहे. जेव्हा एखाद्या स्त्रीच्या आयुष्यात वैधव्य किंवा इतर कारणांमुळे एकाकीपणाची वेळ येते, तेव्हा तिच्यासमोर अनेक प्रश्न उभे राहतात. स्वतःचे जीवन कसे सांभाळायचे? मुलांचे शिक्षण कसे पूर्ण करायचे? आर्थिक स्थैर्य कसे मिळवायचे? समाजात सन्मानाने कसे जगायचे? अशा असंख्य प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा संघर्ष तिला करावा लागतो. विशेषतः कोरोना महामारीच्या काळात आपण या वास्तवाचे अत्यंत भीषण चित्र अनुभवले आहे. हजारो कुटुंबांनी आपल्या आयुष्यातील नात्यांना गमावले.अनेक जवळच्या व्यक्तींच निधन झाले अनेक संसार उध्वस्त झाले.काही महिलांना अकाली वैधव्य आले त्यामध्ये महिला गर्भवती होत्या, काहींच्या कुशीत लहान मुले होती, तर काहींवर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी अचानक येऊन पडली. अशा परिस्थितीत महिलांना केवळ आर्थिक नव्हे तर मानसिक आणि सामाजिक आधाराची देखील अत्यंत गरज होती. याच पार्श्वभूमीवर महिला व बाल विकास विभागामार्फत विविध योजना आणि उपक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये मिशन वात्सल्यसारख्या योजनेने एकल महिलांना आधार देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. शासनाने महिलांच्या पुनर्वसनासाठी, त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी, स्वावलंबनासाठी आणि सामाजिक पुनर्स्थापनेसाठी अनेक योजना उपलब्ध करून दिल्या . त्यामध्ये वेगवेगळ्या विभागामार्फत महिलांना लाभ दिले गेले. भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार दिला आहे. अनुच्छेद १४ सर्वांना कायद्यापुढे समानता प्रदान करतो, तर अनुच्छेद १५ लिंगाच्या आधारावर होणाऱ्या भेदभावास मनाई करतो. अनुच्छेद २१ प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार प्रदान करतो. त्यामुळे एकल महिलांनाही समाजातील इतर नागरिकांप्रमाणेच सर्व अधिकार आणि संधी प्राप्त होणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. महिलांच्या संरक्षणासाठी आणि सक्षमीकरणासाठी विविध कायदे देखील अस्तित्वात आहेत. कायदेशीर तरतुदी, तसेच विविध सामाजिक सुरक्षा योजना महिलांना न्याय व संरक्षण देण्यासाठी कार्यरत आहेत. समाजामध्ये आजही विधवा महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. महिलांना दुय्यम वागणूक दिली जाते, त्यांच्या अस्तित्वाकडे संशयाने पाहिले जाते किंवा त्यांना सामाजिक कार्यक्रमांपासून दूर ठेवले जाते. काही वेळा त्यांच्याकडे दयेच्या भावनेने तर काही वेळा उपेक्षेच्या नजरेने पाहिले जाते. ही मानसिकता बदलणे ही काळाची गरज आहे. याच विचारातून महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाने एक महत्त्वपूर्ण सामाजिक पाऊल उचलले आहे. शासनाने विधवा या शब्दाऐवजी एकल महिला हा सन्मानजनक शब्द वापरण्याचा निर्णय घेतला आहे. कारण एखाद्या स्त्रीची ओळख केवळ तिच्या वैवाहिक स्थितीवर अवलंबून नसते. ती एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे तिची स्वतःची स्वप्ने, क्षमता, कर्तृत्व आणि अस्तित्व आहे. दरवर्षी २३ जून हा एकल महिला दिन म्हणून साजरा करण्यामागे देखील हाच व्यापक सामाजिक संदेश आहे. या दिवसाचा उद्देश केवळ कार्यक्रम आयोजित करणे नसून समाजामध्ये संवेदनशीलता निर्माण करणे, एकल महिलांचे प्रश्न समजून घेणे आणि त्यांना सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक वातावरण निर्माण करणे हा आहे.आज एकल महिलांसमोर अनेक गंभीर आव्हाने आहेत जसे की मानसिक तणाव, नैराश्य, आर्थिक असुरक्षितता, सामाजिक दबाव, मुलांचे संगोपन, आरोग्यविषयक समस्या आणि सुरक्षिततेचे प्रश्न यांचा त्यांना सामना करावा लागत आहे. परंतु या सर्व आव्हानांवर मात करण्याची क्षमता प्रत्येक महिलेमध्ये आहे आणि आवश्यक आहे ते योग्य मार्गदर्शन, संधी, आधार आणि आत्मविश्वासाची हमी देऊ करणारे कोणी सक्षम आधार. शासन विविध योजना, आर्थिक सहाय्य, स्वयंरोजगार प्रशिक्षण, शैक्षणिक सवलती आणि सामाजिक सुरक्षा उपाय उपलब्ध करून देत आहे. परंतु कोणतीही योजना तेव्हाच प्रभावी ठरते जेव्हा तिचा लाभ प्रत्यक्ष गरजू महिलांपर्यंत पोहोचतो. यासाठी शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते आणि समाजातील प्रत्येक नागरिक यांची सामूहिक जबाबदारीआहे.ग्रामपंचायत, पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासन यांनी एकल महिलांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहून त्यांच्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत आहे. तसेच समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या कुटुंबात, परिसरात किंवा कार्यक्षेत्रात असलेल्या एकल महिलांचा सन्मान करणे, त्यांना मानसिक आधार देणे आणि त्यांच्या अधिकारांसाठी जागरूक राहणे आवश्यक आहे. महिलांनी देखील स्वतःला असहाय्य समजण्याऐवजी आपल्या क्षमतांवर विश्वास ठेवला पाहिजे. आयुष्यात आलेल्या कोणत्याही आघातामुळे जीवन थांबत नाही. संकटे येतात, दुःख येते, एकटेपणा जाणवतो; परंतु त्यावर मात करून नव्याने उभे राहण्याची ताकद प्रत्येक स्त्रीमध्ये आहे मानसिकदृष्ट्या सक्षम राहणे, आवश्यकतेनुसार समुपदेशन घेणे, कायदेशीर हक्कांची माहिती करून घेणे आणि स्वावलंबनाच्या दिशेने पावले उचलणे ही काळाची गरज आहे.एकल महिलेला फक्त दया , तर सन्मान, समानता आणि संधीची अधिकार मिळणे आवश्यक आहे. तिच्या संघर्षाकडे केवळ सहानुभूतीने नव्हे तर संवेदनशीलतेने आणि आदराने पाहिले गेले पाहिजे. २३ जून एकल महिला दिन निमित्त आपण सर्वांनी एक संकल्प करूया की कोणत्याही महिलेला तिच्या परिस्थितीमुळे कमी लेखणार नाही, तिच्या सन्मानाचे संरक्षण करू, तिच्या अधिकारांसाठी आवाज उठवू आणि तिच्या आत्मनिर्भरतेच्या प्रवासात सोबती बनू.शासनाने एक पाऊल पुढे टाकले आहे , आता समाज म्हणून आपणही तिचा हात धरून पुढे जाण्याची गरज आहे. कारण एकटेपणावर मात करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे साथ, संवेदना, सहवेदना आणि सन्मान. जेव्हा शासन, समाज आणि कुटुंब एकत्र उभे राहतील, तेव्हा कोणतीही महिला खऱ्या अर्थाने एकटी राहणार नाही. एकल नाही, सक्षम आहे असहाय्य नाही, आत्मनिर्भर आहे आणि समाजाच्या मुख्य प्रवाहातील सन्माननीय नागरिक आहे हा संदेश प्रत्येका पर्यंत पोहोचणे जरुरी आहे.वैधव्याने तिची ओळख ठरत नाही,संकटांनी तिची किंमत कमी होत नाही.ती आई आहे, ती शक्ती आहे, ती आधार आहे,तिच्या संघर्षातूनच नव्या समाजाचा उदय आहे.




भगवंत पाळवदे,
अंबाजोगाई, जि. बीड एकल महिला व अनाथ बालक पुनर्वसन प्रकल्प